



जनमानसाचा निडर आवाज...

# पुणे प्राईम न्यूज

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे

दैनिक | वर्ष १ | अंक २०६ | गुरुवार, १९ फेब्रुवारी २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210


# काकांचा जीव कोणी घेतला हे शोधण्याचं मला वेड लागलंय : आमदार रोहित पवार


## पायलटच्या पात्रतेपासून कंपनीच्या पार्श्वभूमीपर्यंत प्रश्नांची मालिका; विमान दुर्घटनेवरही नवे आरोप

**पुणे, ता. १८ :** दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातानंतर राज्यातील राजकारण तापलेले असतानाच राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी आज पुन्हा एकदा पत्रकार परिषद घेत अनेक गंभीर प्रश्न उपस्थित केले. हा अपघात खरोखरच अपघात होता की त्यामागे घातपाताची शक्यता आहे, याबाबत सखोल चौकशी व्हावी, अशी त्यांची ठाम मागणी आहे.

अजित पवार यांचा २८ जानेवारी रोजी बारामती विमानतळावर लँडिंगदरम्यान झालेल्या दुर्घटनेत मृत्यू झाला. या घटनेने राज्यभर शोककळा पसरली. मात्र त्यानंतर काही दिवसांतच अपघातातील तांत्रिक बाबी, पायलटचा अनुभव, विमान कंपनीची पार्श्वभूमी आणि तपासातील विलंब यावरून प्रश्न उपस्थित होऊ लागले. रोहित पवार यांनी याच पार्श्वभूमीवर आज पुन्हा एकदा हल्लाबोल केला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भावनेच्या भरात बोलले जात आहे असा सूचक टोला लगावल्याच्या पार्श्वभूमीवर रोहित पवार यांनी प्रतिउत्तर दिले. जर मी भावनेतून बोलत असेन, तर मग मला ट्रोल करण्याची गरज काय? काही ट्रोलर्स आणि आयटी सेलशी संबंधित मंडळी माझ्याविरोधात मोहीम राबवत आहेत, असा आरोप त्यांनी केला. समित ठक्कर यांच्यासारखे ट्रोलर पैशासाठी काम करत असल्याचा दावा करत त्यांनी सोशल मीडियावरील प्रचारावरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

रोहित पवार यांचा मुख्य रोख व्हीएसआर विमान कंपनीकडे होता. या कंपनीच्या पायलट सुमित कपूर यांच्याबाबत गंभीर आरोप करत त्यांनी सांगितले की कपूर यांना पूर्वी ३ ते ४ वर्षे निलंबित करण्यात आले होते आणि ते कमी पगारावर काम करत होते. यामुळे त्यांच्या पात्रतेबाबत शंका निर्माण होते, असे त्यांनी सूचित केले.



व्हीएसआर कंपनीचा मालक विजय सिंग यांचा मुलगा रोहित सिंग सध्या अमेरिकेतील मायामी येथे राहत असल्याचे त्यांनी नमूद केले. त्याची पत्नी श्वेता सिंग हिच्यावरही पूर्वी एका जेट कंपनीतील गैरव्यवहारांच्या आरोपांमुळे राजीनामा द्यावा लागल्याचा दावा त्यांनी केला. या सगळ्या पार्श्वभूमीवर केंद्रीय हवाई उड्डाण मंत्री राममोहन नायडू यांच्यावरही त्यांनी अप्रत्यक्ष टीका केली. मंत्री आणि कंपनी मालक यांच्यातील संबंधांमुळे तपासाची निष्पक्षता प्रश्नांकित होऊ शकते, असा त्यांचा सूर होता.

रोहित पवार यांनी आणखी एक महत्त्वाचा मुद्दा उपस्थित केला. लेगेसी आणि लिएर जेट ही वेगवेगळ्या प्रकारची विमाने असून त्यासाठी स्वतंत्र परवाना आवश्यक असतो. मात्र संबंधित पायलट दोन्ही प्रकारची विमाने उडवत असल्याचे रेकॉर्ड आमच्याकडे असल्याचा दावा त्यांनी केला. त्यामुळे बनावट कागदपत्रांचा संशय त्यांनी व्यक्त केला. तसेच व्हेनेझुएलाचा कॅप्टन कार्लोस नावाचा वैमानिक प्रवासी म्हणून भारतात येऊन प्रत्यक्षात कॉकपीटमध्ये जाऊन विमान चालवत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

या सर्व आरोपांमुळे प्रकरणाला नवे वळण मिळाले आहे. अजित पवार हे राज्यातील प्रभावी नेते होते आणि त्यांचा मृत्यू केवळ वैयक्तिक हानी नसून मोठ्या राजकीय पोकळीचे कारण ठरला आहे. त्यामुळे या दुर्घटनेचा तपास पारदर्शक आणि विश्वासार्ह पद्धतीने होणे अत्यावश्यक आहे. अपघाताम ागील तांत्रिक कारणे, मानवी चुका की अन्य काही घटक, हे स्पष्ट झाल्याशिवाय निर्माण झालेल्या शंका निवळणार नाहीत.

### संक्षिप्त

## भोसरीत १६ किलो गांजासह दोघे अटकेत

**पिंपरी, ता. १८ :** भोसरी परिसरात मोठ्या प्रमाणात गांजाची साठवणूक करून तो विक्रीसाठी आणणाऱ्या दोघांना पोलिसांनी अटक केली. ही कारवाई मंगळवारी (१७ फेब्रुवारी) देवकर वस्ती, भोसरी येथे करण्यात आली. विशाल रावण मोहिते (२४, यमाई नगर, साई पार्क, दिघी गाव) आणि गणेश बाबुराव थोरात (२४, यमाई नगर, साई पार्क, दिघी गाव) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. याप्रकरणी पोलीस शिपाई अशोक माने यांनी भोसरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, भोसरी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मोकळ्या जागेत आरोपींनी विक्रीसाठी १६ किलो १२० ग्रॅम वजनाचा गांजा बेकायदेशीरपणे जवळ बाळगला होता. पोलिसांनी धाड टाकून त्यांच्याकडून ८ लाख ८० हजार रुपये किमतीचा हा मुद्देमाल जप्त केला आहे. भोसरी पोलीस तपास करत आहेत.




## पोल्ट्री फार्ममधील ३७० कोंबड्या चोरीला, महिलेसह दोघांविरोधात गुन्हा

**पिंपरी, ता. १८ :** खेड तालुक्यातील चिंचोशी येथे एका पोल्ट्री फार्मवर काम करणाऱ्या दोघांनी कोंबड्या आणि खाद्य चोरून नेल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. ही घटना २४ सप्टेंबर २०२५ ते १४ फेब्रुवारी २०२६ दरम्यान चिंचोशी येथील एका पोल्ट्री फार्मवर घडली.

याप्रकरणी ३५ वर्षीय तरुणाने चाकण उत्तर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार एका महिलेसह दोघांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी हे फिर्यादीच्या पोल्ट्री फार्मवर काम गार म्हणून काम करत होते. त्यांनी फिर्यादीचा विश्वास संपादन करून ७५ हजार रुपये किमतीच्या ३७० जिवंत बॉयलर कोंबड्या आणि एक लाख ३२ हजार रुपये किमतीची कोंबडी खाद्याची ६० पोती, असा एकूण २ लाख ७ हजार रुपयांचा माल परस्पर चोरून नेला. चाकण पोलीस तपास करत आहेत.

# पुणे–पिंपरीत ड्रोन क्लस्टर आणि खाद्यप्रक्रिया सुविधा केंद्र उभारणीचा मार्ग मोकळा

**पुणे, ता. १८ :** पुणे आणि पिंपरी चिंचवड परिसरातील उद्योगांना अधिक बळ देणारे दोन महत्त्वाचे प्रकल्प लवकरच साकारले जाणार आहेत. सूक्ष्म आणि लघुउद्योगांना जागतिक बाजारपेठेत टिकून राहण्यासाठी मदत करणारा ड्रोन क्लस्टर आणि अत्याधुनिक खाद्यप्रक्रिया सुविधा केंद्र उभारण्याचा पुढाकार मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चर यांनी घेतला आहे. हे दोन्ही प्रकल्प मार्च २०२७ पर्यंत सुरू होण्याची शक्यता आहे.

या प्रकल्पांच्या पहिल्या टप्प्यात सुमारे १०० ते २०० सूक्ष्म आणि लघुउद्योजकांना थेट लाभ मिळणार आहे. विशेषतः ड्रोन, अन्नप्रक्रिया, स्टार्टअप्स, शेतकरी उत्पादक कंपन्या तसेच पुरवठा



साखळीतील उद्योगांसाठी या केंद्रांमध्ये चाचणी सुविधा, संशोधन व विकासासाठी मदत, प्रोटोटाइप तयार करण्याची सोय आणि तज्ज्ञांचे मार्गदर्शन उपलब्ध होणार आहे. त्यामुळे नव्या उद्योजकांना आपले उत्पादन बाजारात आणण्यापूर्वी आवश्यक तांत्रिक आधार मिळेल.

ड्रोन क्लस्टर पिंपरी परिसरात उभारले जाणार असून येथे ड्रोनचे सुटे भाग तयार करणे, डिझाइन, संशोधन आणि चाचणीसाठी आधुनिक यंत्रसामग्री असणार आहे. संरक्षण, कृषी, आपत्ती व्यवस्थापन, सर्वेक्षण आणि वाहतूक क्षेत्रात ड्रोनचा वाढता वापर लक्षात घेऊन हे केंद्र महत्त्वाची भूमिका बजावणार आहे.

त्याचबरोबर हडपसर परिसरात खाद्यप्रक्रिया सुविधा केंद्र उभारले जाणार आहे. येथे अन्नपदार्थांची गुणवत्ता तपासणी, पॅकेजिंगसाठी प्राथमिक चाचण्या आणि निर्यातीसाठी आवश्यक प्रक्रिया करता येणार आहेत. त्यामुळे अन्नप्रक्रिया उद्योगातील उद्योजकांना आपली उत्पादने अधिक दर्जेदार बनवता येतील.

हे प्रकल्प एमएसएमई क्लस्टर डेव्हलपमेंट प्रोग्राम अंतर्गत राबवले जाणार आहेत. १० कोटी रुपयांपर्यंतच्या प्रकल्पांना केंद्र आणि राज्य शासनाकडून सुमारे ९५ टक्क्यांपर्यंत आर्थिक मदत मिळू शकते. ३० कोटी रुपयांच्या प्रकल्पांमध्ये शासनाचा वाटा किम ान ७० टक्के राहणार आहे. लवकरच या प्रकल्पांचे प्रस्ताव राज्य शासनाकडे सादर करण्यात येणार असून मंजुरीनंतर पुढील प्रक्रिया सुरू होईल. या उपक्रमांमुळे उद्योग क्षेत्राला चालना मिळून मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती होण्याची अपेक्षा आहे.

# राज ठाकरेंनी घेतली उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट; चर्चांना उधाण

**मुंबई, ता. १८ :** महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एकदा चर्चांना उधाण आले आहे. मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी आज ठाण्यातील नंदनवन बंगल्यावर जाऊन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. नुकत्याच पार पडलेल्या महानगरपालिका आणि जिल्हा परिषद निवडणुकांनंतर दोन्ही नेत्यांची ही पहिली प्रत्यक्ष भेट असल्याने राजकीय वर्तुळात विविध तर्कवितर्क सुरू झाले आहेत. मात्र, या भेटीमागील अधिकृत कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

सूत्रांच्या माहितीनुसार, राज्यातील सध्याच्या राजकीय परिस्थितीवर, स्थानिक स्वराज्य संस्थांमधील निकालांवर तसेच काही शासकीय विषयांवर चर्चा झाली. दोन्ही नेत्यांमध्ये सुमारे तासभर



संवाद झाल्याचे सांगितले जाते. आगामी राजकीय समीकरणांच्या पार्श्वभूमीवर या भेटीकडे विशेष लक्ष दिले जात आहे.

दरम्यान, शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी या भेटीवर प्रतिक्रिया देताना म्हटले की, राज ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांची भेट ही स्वाभाविक आहे. एकनाथ शिंदे राज्याचे उपमुख्यमंत्री आहेत आणि राज ठाकरे एका पक्षाचे प्रमुख आहेत. त्यामुळे या भेटीत आक्षेपार्ह असे काही नाही. यामागे काही राजकीय किंवा शासकीय कारण असू शकते. गेल्या चार वर्षांत राज ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांच्यात अनेक वेळा अधिकृत तसेच अनौपचारिक भेटी झाल्या आहेत. २०२२ मध्ये मुख्यमंत्री झाल्यानंतर शिंदे यांनी राज ठाकरे यांच्या शिवतीर्थ निवासस्थानी जाऊन गणेश दर्शन घेतले होते. त्यानंतर चित्रपट मुहूर्त, विधानभवनातील अधिवेशन, गुढीपाडव्याच्या मेळाव्यानंतरची सदिच्छा भेट, बीडीडी चाळ पुनर्विकासाचा मुद्दा, तसेच विधानसभा निवडणुकीपूर्वी आणि नंतरही दोन्ही नेत्यांमध्ये संवाद झाला होता. सत्तांतरानंतरच्या काळात दोघांमध्ये सातत्याने संपर्क राहिल्याचे चित्र दिसते. २०२३ ते २०२६ या काळात विविध निमित्ताने १० ते १५ पेक्षा अधिक वेळा त्यांची भेट झाल्याचे राजकीय निरीक्षक सांगतात. त्यामुळे आजची भेट ही पूर्णपणे अनपेक्षित नसली तरी निवडणुकांनंतरच्या नव्या राजकीय समीकरणांच्या पार्श्वभूमीवर तिचे महत्त्व वाढले आहे. या भेटीनंतर कोणतेही संयुक्त निवेदन जारी करण्यात आलेले नसले तरी आगामी राजकीय हालचालींवर त्याचा परिणाम होतो का, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

# कदमवाकवस्तीतील सलेंडरचा स्फोट गॅस गळतीमुळे; आगीत सुमारे दीड लाखांचे सामग्री खाक

**लोणी काळभोर, ता. १८ :** कदमवाकवस्ती (ता. हवेली) ग्राम पंचायत हद्दीतील अमित बिर्याणी हॉटेलच्या किचनमध्ये गॅस गळती मुळे सिलेंडरचा जोरदार स्फोट होऊन आग लागल्याची घटना मंगळवारी (ता. १७) रात्री सव्वा नऊच्या सुमारास घडली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, किचनमधील साहित्य जळून खाक झाल्याने सुमारे १ लाख ५० हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. अर्ध्या तासाच्या अथक प्रयत्नानंतर अग्निशामक दलाने आग आटोक्यात आणल्याने मोठी दुर्घटना टळली.

प्राथमिक माहितीनुसार, पुणेसोलापूर राष्ट्रीय महामार्ग लगत कृष्णा लॉजजवळ हे हॉटेल असून मूळ मालक अमित दत्तात्रय कामठे यांनी ते दीक्षित दिवाकर शेट्टी यांना चालविण्यास दिले आहे. मंगळवारी रात्री अचानक किचनमधून धूर निघू लागल्यानंतर काही क्षणातच आगीने रौद्र रूप धारण केले. नागरिकांची पळापळ सुरू झाली. त्याचवेळी एका सिलेंडरचा मोठा स्फोट झाला. स्फोटाचा आवाज इतका तीव्र होता की संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले.


घटनेची माहिती मिळताच लोणी काळभोर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक (गुन्हे) स्मिता पाटील, सहाय्यक पोलीस निरीक्षक अंकुश बोराटे, पोलीस हवालदार तेज भोसले, चेतन कुंभार, बीट मार्शल महेंद्र अगळे, मयूर बोरावके व त्यांचे सहकारी घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी प्राथमिक स्वरूपात आग विझविण्याचा प्रयत्न केला. मात्र, आगीने तीव्र स्वरूप धारण केल्याने तत्काळ पुणे महानगरपालिकाच्या हडपसर व काळे पडळ अग्निशमन केंद्राच्या गाड्या पाचारण करण्यात आल्या. हडपसर अग्निशमन केंद्राचे प्रमुख प्रमोद सोनवणे यांच्यासह फायरमन बाबासाहेब चव्हाण, सोमनाथ मोटे, ज्ञानेश्वर आढाळगे, भास्कर घुले, मंगेश शिंदे, रोहित कांबळे, चालक उत्कर्ष टिळेकर तसेच काळे पडळ अग्निशमन केंद्राचे प्रभारी सब ऑफिसर विलास दडस, फायरमन राजीव टिळेकर, विजय चव्हाण, विकास गायकवाड, अमित शिंदे व सुरज शिंदे यांनी घटनास्थळी पाण्याचा जोरदार मारा केला.

यावेळी हॉटेलमधील उर्वरित दोन सिलेंडर सुरक्षित बाहेर काढण्यात आले. अखेर अवघ्या अर्ध्या तासात आगीवर पूर्ण नियंत्रण मिळवण्यात यश आले. दरम्यान, या स्फोटात किचनमधील साहित्य, उपकरणे व आतील भाग पूर्णपणे जळून खाक झाला आहे. या आगीत १ लाख ५० हजार रुपयांचे नुकसान झाले आहे.

# भीमा पाटस साखर कारखान्याच्या चौकशीचे आदेश; रमेश थोरातांसह शेतकऱ्यांच्या तक्रारी

**दौंड, ता. १८ :** भाजपचे दौंडमधील आमदार राहुल पुल अध्यक्ष असलेल्या भीमा पाटस सहकारी साखर कारखान्याच्या चौकशीचे आदेश पुणे प्रादेशिक साखर सहसंचालक नीलिमा गायकवाड यांनी जारी केले आहेत. माजी आमदार रमेश थोरात यांच्यासह काही शेतकऱ्यांच्या तक्रारीवरून सहकारी संस्था कायदा कलम ८३ (१) अन्वये ही चौकशी लावण्यात आली आहे.

भीमा पाटस सहकारी साखर कारखान्यासंदर्भात सहकार मंत्र्यांकडे दाखल प्रकरणात कायद्यातील कलम ८३ (१)मधील तरतुदींच्या पूर्ततेसंबंधीची पडताळणी



करण्याकरिता हे प्रकरण फेरनिर्णयार्थ साखर सहसंचालक कार्यालयाकडे पाठविण्यात आले होते. त्यांनी घेतलेल्या उभयपक्षी संयुक्त सुनावण्यानंतर हे आदेश जारी करण्यात आले आहेत. भाजपच्या आमदाराच्या कारखान्याची राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या माजी आमदाराच्या तक्रारीवर अशा प्रकारची चौकशी लागल्याने जिल्ह्यातील सहकार वर्तुळात खळबळ उडाली आहे.

सहकार खाते हे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडे असल्यामुळे जिल्ह्यातील भाजपच्या एकमेव आमदाराला शह देण्याचा प्रयत्न यातून दिसून येत असल्याची चर्चा सुरू झाली आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०चे कलम सहकार कायद्यातील कलम ८३अन्वये साखर सहसंचालकांनी चौकशीचे आदेश दिलेले आहेत. कारखान्याच्या कारभाराच्या विविध १३ मुद्द्यांवर ही चौकशी होणार असून त्यासाठी सहकारी संस्थांचे विशेष लेखापरीक्षक वर्ग १ (साखर) द्वारकानाथ पवार यांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली आहे.

साखर कारखान्याच्या कारभारामध्ये नक्की किती घोटाळा झाला, किती किमतीचे आर्थिक नुकसान झाले. तसे झाले असल्यास या आर्थिक नुकसानीच्या रकमेबाबत मुद्देनिहाय स्वयंस्पष्ट अहवाल सादर करावा. चौकशी अधिकारी यांनी चौकशी आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत चौकशी पूर्ण करावी, असेही गायकवाड यांनी दिलेल्या आदेशात म्हटले आहे.

## संक्षिप्त




### दुचाकी चोरीच्या तपासातून घरफोडी टोळीचा पर्दाफाश; दोन अल्पवयीन ताब्यात

**फुरसुंगी, ता. १८ :** फुरसुंगी पोलिसांनीएका साध्या दुचाकी चोरीचा तपास करताना एका मोठ्या गुन्हेगारी साखळीचा पर्दाफाश केला आहे. संशयास्पदरित्या फिरणाऱ्या दोन अल्पवयीन मुलांना ताब्यात घेतल्यानंतर त्यांनी दिलेल्या कबुलीने पोलीसही चक्रावून गेले. दुचाकी चोरणाऱ्या या मुलांनी परिसरात चक्क घरफोड्यांचा धडाका लावल्याचे समोर आले आहे. अमोल कुंभार यांची 'होंडा शाईन' दुचाकी चोरीला गेली आणि त्यांनी पोलिसांत धाव घेतली. तपास सुरू असतानाच पोलिसांना खबर मिळाली की, फुरसुंगी रेल्वे पुलाखालील पॉवर हाऊस परिसरात दोन मुले एका काळ्या रंगाच्या दुचाकीसह फिरत आहेत. पोलिसांनी वेळ न घालवता तिथे सापळा रचला आणि दोन्ही मुलांना ताब्यात घेतले. सुरुवातीला ही मुले पोलिसांना गुंगारा देत होती, मात्र पोलिसांनी आपला खाक्या दाखवताच संपूर्ण माहिती सांगितली. धक्कादायक बाब म्हणजे, चोरलेल्या दुचाकींचा वापर करून त्यांनी परिसरात दोन ठिकाणी घरफोड्याही केल्या होत्या. त्यांच्याकडून पोलिसांनी २ दुचाकी, १ मोबाईल, रोकड आणि महागडे कपडे असा एकूण १ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून अधिक तपास सुरु आहे.




### श्रीनाथ भिमाले होणार पुण्याचे नवे स्थायी समिती अध्यक्ष


**पुणे, ता. १८ :** पुणे महापालिकेच्या स्थायी समिती अध्यक्षपदाचा सस्पेन्स अखेर संपला आहे. भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी श्रीनाथ भिमाले यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले असून, तसे अधिकृत पत्र गटनेते गणेश बिडकर यांना दिले आहे. सोमवारी सकाळी साडेअकरा वाजता या पदासाठी अधिकृत निवडणूक पार पडेल. स्थायी समिती अध्यक्षपद हे महापालिकेतील सर्वात महत्वाचे पद मानले जाते. भिमाले यांच्याकडे असलेला दांडगा अनुभव आणि पक्षांतर्गत पकड लक्षात घेता, आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भाजपने हा महत्वाचा निर्णय घेतला आहे.

### औरंगजेबाची कबर महाराष्ट्रातून हटवू : नवनीत राणा



**अमरावती, ता. १८ :** काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांचा निषेध व्यक्त करताना औरंगजेबाची कबर महाराष्ट्रातून हटवू असा दावा भाजपाच्या माजी खासदार नवनीत राणा यांनी केला. काँग्रेस पक्षाचे टिपू सुलतानविषयी असलेले प्रेम आता उतू चालले आहे. कधी औरंगजेबाच्या कबरीचे समर्थन काँग्रेस करते, तर कधी टिपू सुलतानची प्रतिमा लावणाऱ्यांना प्रोत्साहन देण्याचे काम काँग्रेस पक्ष करतो. काँग्रेसची हीच विचारधारा आहे. गेल्या  वर्षांपासून ती काँग्रेसने जपली आहे; पण आता ती त्यांच्या मुखातून बाहेर पडायला लागली आहे, अशी टीकाही त्यांनी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सपकाळ यांच्यावर केली. लवकरच औरंगजेबाची कबर लवकरच महाराष्ट्रातून हटविली जाईल, त्या कामावर सुद्धा आम्ही लागलो आहोत. ज्या औरंगजेबाने संभाजी महाराजांना अत्यंत अमानूष पद्धतीने छळ करून मारले, त्या औरंगजेबाच्या कबरीवर जाऊन आपण काय सिद्ध करीत आहोत, याचा विचार प्रत्येकाने केला पाहिजे. औरंगजेबाची कबर महाराष्ट्रात आहे, हे गेल्या ६० वर्षांचे काँग्रेसचे पाप आहे, अशी टीकाही राणा यांनी केली.

### मनोज जरांगे यांचा राज्य सरकारला इशारा



**जालना, ता. १८ :** हैदराबाद गॅझेटची अधिसूचना काढूनही कुणबी प्रमाणपत्रांचे वाटप होत नसेल तर आम्हाला पुन्हा आंदोलन करावे लागेल, असा इशारा मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी राज्य सरकारला दिला, ते छत्रपती संभाजीनगर येथे माध्यमांशी बोलत होते. शिंदे समितीला मुदतवाढ देऊनही कुणबी नोंदी का सापडत नाहीत? याचे उत्तर द्यावे. देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे आणि विखे पाटील यांनी मराठ्यांना आरक्षण दिले आहे. मात्र, सरकारमधील काहींची पोटदुखी असू शकते. गोरगरीबांचा अवमान सहन केला जाणार नाही, असेही जरांगे म्हणाले. अधिवेशनानंतर कुणबी प्रमाणपत्र वाटपाचा निर्णय न झाल्यास आम्हाला पुन्हा आंदोलन करावे लागेल. त्याची सरकारला मोठी राजकीय किंमत मोजावी लागेल, असा इशाराही जरांगे पाटलांनी दिला आहे. त्यामुळे जरांगे पाटील यांनी दिलेल्या इशाऱ्यानंतर राज्य सरकार काय निर्णय घेणार हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

# राष्ट्रवादीच्या विलिनीकरणानंतर खासदार अमोल कोल्हे होणार होते प्रदेशाध्यक्ष ?

## रोहित पवारांचा गौप्यस्फोट



**मुंबई, ता. १८ :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी आज घेतलेल्या पत्रकार परिषदेत पुन्हा एकदा दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताबाबत गंभीर प्रश्न उपस्थित केले. अपघात की घातपात, यावर सखोल चौकशी व्हावी, अशी मागणी करत त्यांनी व्हीएसआर कंपनी आणि कॅप्टन सुमित कपूर यांच्या भूमिकेवर शंका व्यक्त केली.

रोहित पवार म्हणाले की, आम्ही सातत्याने पुरावे मांडत आहोत. काही गोष्टी संशयास्पद आहेत. तपास यंत्रणांनी केवळ औपचारिक चौकशी न करता सर्व बाजूंनी तपास करावा. त्यांनी अपघातातील तांत्रिक बाबी, निर्णयप्रक्रिया आणि संबंधित कंपनीच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित केले.

पत्रकार परिषदेत रोहित पवार यांनी दोन राष्ट्रवादी काँग्रेस गटांच्या संभाव्य विलिनीकरणाबाबतही मोठा खुलासा केला. आज अजित दादा आपल्यात नाहीत, त्यामुळे विलिनीकरणावर बोलणं योग्य नाही. मात्र, संयुक्त राष्ट्रवादी काँग्रेस झाल्यानंतर नेतृत्वात बदल करण्याची त्यांची इच्छा होती, असे ते म्हणाले.

रोहित पवार यांच्या मते, अजित पवार यांना प्रदेशाध्यक्षपदी तरुण चेहरा हवा होता आणि त्यासाठी खासदार अमोल कोल्हे यांचे नाव त्यांच्या मनात होते. अमोल कोल्हे अनेक बैठकींमध्ये सक्रिय होते. त्यादृष्टीने चर्चा पुढे सरकत होत्या, असा दावा त्यांनी केला. तसेच, दोनही पक्ष एकत्र यावेत, ही दादांची भावनिक इच्छा होती. राजकीय समीकरणांपेक्षा कुटुंब एकत्र यावं, असं त्यांना वाटत होतं, असेही रोहित पवार यांनी स्पष्ट केले.

रोहित पवार यांनी सांगितले की, विलिनीकरणासंदर्भात १३ बैठका झाल्या होत्या. त्या बैठका जयंत पाटील यांच्या घराजवळ झाल्या. तिथल्या सीसीटीव्हीत दादा दिसतील, असा दावा त्यांनी केला. विलिनीकरणाचा मुद्दा पुढे केला की काही जणांना त्यावरच बोलायला आवडते, असा टोला रोहित पवार यांनी लगावला. नाव न घेता त्यांनी राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्यावर टीका केली. आम्ही अपघात की घातपात यावर बोलत आहोत, पण काही जण फक्त विलिनीकरणावरच चर्चा करत आहेत, असे ते म्हणाले. दरम्यान, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना राष्ट्रीय अध्यक्ष करण्यासाठी ३५ आमदारांनी सह्या केल्याची चर्चा आहे. यावरही रोहित पवार यांनी प्रश्न उपस्थित केला. इतर आमदारांनी किंवा पदाधिकाऱ्यांनी सह्या का केल्या नाहीत? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. एकूणच, रोहित पवार यांच्या पत्रकार परिषदेमुळे अजित पवारांच्या विमान अपघाताचा तपास, तसेच राष्ट्रवादी काँग्रेसमधील अंतर्गत घडामोडी पुन्हा एकदा चर्चेत आल्या आहेत. पुढील काही दिवसांत या प्रकरणात आणखी राजकीय घडामोडी घडण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

### तुकाराम मुंढे यांच्यावर बच्चू कडूंची नाराजी

**अमरावती,त आ. १८ :** प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी वरिष्ठ सनदी अधिकारी तुकाराम मुंढे यांच्याविषयी उघडपणे नाराजी व्यक्त केली. दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव म्हणून तुकाराम मुंढे रूजू झाल्यानंतर हे मंत्रालय वेगाने चालेल असे वाटले होते; पण ते त्यांच्याच तोऱ्यात आहेत, असे बच्चू कडू म्हणाले.

शासकीय सेवेत अंपगांसाठी असलेल्या ४ टक्के आरक्षणाच्या अंमलबजावणीची खातरजमा करण्यासाठी दिव्यांग कल्याण विभागाने राज्य शासनाच्या सर्व ४० विभागांना त्यांच्या अपंग कर्मचाऱ्यांची माहिती मागवली होती. मात्र, केवळ दोनच विभागांनी माहिती सादर केली असून ३८ विभागांनी माहिती देण्यास टाळाटाळ चालवली आहे. त्यावरून माजी मंत्री बच्चू कडू यांनी तुकाराम मुंढे यांच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

## येवलेवाडीत ज्वेलरी दुकानातील गोळीबार प्रकरण; कामगाराच्या हत्येतील आरोपीला जामीन मंजूर

**पुणे, ता. १८ :** येवलेवाडी येथील गणेश ज्वेलर्समध्ये भरदिवसा घडलेल्या थरारक गोळीबार प्रकरणात कामगार अमरत परिहार याची निर्घृण हत्या करणाऱ्या आरोपीला जामीन मंजूर केला आहे. अतिरिक्त सत्र न्यायालयाचे न्यायाधीश डी. आर. शेट्टी यांनी जमिनाचे आदेश पारित केल्याची माहिती आरोपीचे वकील ॲड. जितेंद्र अशोक जानापुरकर यांनी दिली.

विकास सुरेश सिंग (रा. सिशोनी प्रबोधी, ता. हंसिकेव्रल, जि. वैशाली, बिहार) असे जामिनावर सुटलेल्या आरोपीचे नाव आहे. हि घटना २१ नोव्हेंबर २०१८ रोजी दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास घडली होती.

मिळालेल्या माहितीनुसार, येवलेवाडी येथील गणेश ज्वेलर्स दुकानात काम करणारा अमरत परिहार हा काऊंटरवर असताना चार अनोळखी इसम दुकानात दाखल झाले. काही वेळ संभाषण केल्यानंतर त्यातील एका इसमाने जवळील पिस्तूलातून अमरत परिहारवर गोळी झाडली. गोळी त्याच्या छातीच्या उजव्या बाजूस लागून तो गंभीर जखमी झाला. आरोपींनी तत्काळ दोन मोटारसायकलवरून पळ काढला. तर जखमी अवस्थेत अमरत परिहार याला तातडीने रिक्षाद्वारे रुग्णालयात हलविण्यात आले; मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला.



या प्रकरणी फिर्यादी दिपक दत्तू कामठे यांनी कोंढवा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. पोलिसांनी दुकानातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तपास सुरू केला. फुटेजमध्ये पांढरा शर्ट घातलेला आणि दाढी असलेला इसम गोळी झाडताना स्पष्ट दिसत असल्याचे समोर आले होते. त्यानुसार या गुन्ह्यात विकास सुरेश सिंग याला अटक करण्यात आली होती. आरोपीविरुद्ध भा.दं.वि. कलम ३०२, ३०७, १२० (ब), ३४ तसेच आर्म क्ट ३(२५), ३७(१) व महाराष्ट्र पोलिस ॲक्ट १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्ह्यात जमीन मिळण्याकामी आरोपीने ॲड. जितेंद्र अशोक जानापुरकर यांच्यामार्फत न्यायालयात जमीन अर्ज दाखल केला होता. सदर अर्जावर आरोपी तर्फे ॲड. जितेंद्र अशोक जानापुरकर यांनी आरोपीला जामीन मिळण्याकामी युक्तिवाद करून आरोपी तर्फेबाजू मांडली. तसेच सरकार पक्षातर्फे सरकारी वकील यांनी देखील आरोपीला जामीन मिळू नये म्हणून बाजू मांडली. दरम्यान, न्यायालयाने दोन्ही बाजूचा युक्तिवाद ऐकून घेतला. तसेच सर्व बाजूचा विचार करता न्यायाधीश डी. आर. शेट्टी यांनी आरोपीला अटी व शर्तींवर जामिनावर सोडण्याचे आदेश दिलेत. या प्रकरणात ॲड. स्वप्नील दाभाडे, ॲड. अफरोज जहागीरदार, ऋषिकेश पाटील. यांनी सहकार्य केले.



### भाजपाच्या फोडाफोडीची एकनाथ शिंदे गटाला धास्ती ?

**सातारा, ता. १८ :** सातारा जिल्हा परिषदेतील सत्तास्थापनेचा संघर्ष टोकाला पोहोचला असून भाजपाच्या फोडाफोडीची भीतीने शिवसेना शिंदे गट आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने आपल्या नवनिर्वाचित सदस्यांना अज्ञातस्थळी ठेवल्याची माहिती सूत्रांनी दिली. सातारा जिल्हा परिषद निवडणुकीच्या निकालात कोणालाच स्पष्ट बहुमत मिळाले नसले तरीही २७ जागा जिंकून भाजपा क्रमांक एकचा पक्ष ठरला. त्यापाठोपाठ अजित पवार यांच्या राष्ट्रवादीने २१ आणि शिवसेना शिंदे गटाने १५ जागा जिंकल्या.

यादरम्यान भाजपाला सत्तेतून दूर ठेवण्यासाठी शिंदे गट व राष्ट्रवादीने तयारी केली. दुसरीकडे- काहीही झाले तरी जिल्हा परिषद अध्यक्ष हा भाजपचाच होणार असल्याचे वक्तव्य भाजपचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी केले होते. त्यामुळे नवनिर्वाचित सदस्यांच्या फोडाफोडी होऊ नये म्हणून शिंदे गट व राष्ट्रवादीने जिल्हा परिषद सदस्यांना अज्ञातस्थळी ठेवल्याचे सूत्रांनी सांगितले आहे.

## राज्यसभेच्या रिक्त होणाऱ्या ३७ जागांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर

### महाराष्ट्रातील ७ जागांसाठी १६ मार्चला मतदान



**नवी दिल्ली, ता. १८ :** राज्यसभेच्या रिक्त होणाऱ्या ३७ जागांसाठी निवडणुकीची घोषणा करण्यात आली आहे. एप्रिल २०२६ मध्ये सदस्यांचा कार्यकाळ संपत असल्याने ही निवडणूक होणार आहे. देशभरातील विविध राज्यांतील जागांसाठी मतदान होणार असून त्यामध्ये महाराष्ट्रातून सर्वाधिक ७ जागांसाठी निवडणूक होणार आहे.

निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार अर्ज भरण्याची अंतिम तारीख ५ मार्च निश्चित करण्यात आली आहे. त्यानंतर ६ मार्च रोजी अर्जांची छाननी केली जाईल. उमेदवारांना माघार घेण्यासाठी ९ मार्चपर्यंत मुदत देण्यात आली आहे. मतदानाची प्रक्रिया १६ मार्च रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत पार पडणार आहे. त्याच दिवशी सायंकाळी ५ वाजल्यापासून मतमोजणी सुरू होणार असून निकाल त्यानंतर जाहीर केले जातील.

महाराष्ट्रातील ७ जागांसाठी होणारी ही निवडणूक राजकीयदृष्ट्या महत्त्वाची मानली जात आहे. विधानसभेतील पक्षीय संख्याबळाच्या पार्श्वभूमीवर कोणत्या पक्षाला किती जागा मिळणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. पुढील काही दिवसांत उमेदवारी अर्जांमुळे राजकीय हालचालींना वेग येण्याची शक्यता आहे.

महाराष्ट्रातून शरद पवार, रामदास आठवले, फौजिया खान, रजनी पाटील, प्रियांका चतुर्वेदी, धैर्यशील पाटील आणि भागवत कराड यांचा कार्यकाळ संपत आहे. त्यामुळे राज्यात या सात जागांसाठी मतदान होणार आहे. महाराष्ट्रासह ओदिशा, तमिळनाडू, पश्चिम बंगाल, आसाम, बिहार, छत्तीसगड, हरियाणा, हिमाचल प्रदेश, तेलंगणा या राज्यांमध्येही राज्यसभेच्या निवडणुका पार पडणार आहे.

## कदमवाकवस्ती येथे भरदिवसा सदनिका फोडली

### रोख रकमेसह सुमारे २ लाखांचा ऐवज लंपास

**लोणी काळभोर, ता. १८ :** घरी कोणी नसल्याची संधी साधून चोरट्यांनी भरदिवसा फ्लॅट फोडून रोख रकमेसह सुमारे २ लाख रुपयांच्या सोन्या चांदीच्या दागिन्यांवर डल्ला मारल्याची घटना घडली आहे. ही घटना कदमवाकवस्ती येथील कवडीपाट टोलनाकाजवळ असलेल्या श्री आरंभ अपार्टमेंटमध्ये घडली आहे. भरदिवसा झालेल्या या धाडसी घरफोडीमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

याप्रकरणी ॲम्बुलन्स चालक अमर विठ्ठल खरात यांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार अज्ञात चोरट्याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अमर खरात हे कामानिमित्त बाहेर गेले असताना त्यांच्या पत्नी शिक्षणासाठी कॉलेजमध्ये गेल्या होत्या. याच संधीचा फायदा घेत चोरट्यांनी तिसऱ्या मजल्यावरील फ्लॅट क्रमांक ३०२ चे कुलूप तोडून घरात प्रवेश केला. बेडरूममधील कपाट उचकटून लॉकरमधील सोन्याचे मिनी गंठन, अंगठ्या, मंगळसूत्र, कानातले, लहान मुलाचे दागिने, चांदीचे साहित्य तसेच पिशवीतील १ लाख रुपये रोख असा मौल्यवान ऐवज चोरून नेला.

अमर खरात हे कामावरून परत आल्यानंतर त्यांना घराचे कुलूप तुटलेले दिसले. त्यांनी घरात जाऊन तपासणी केली असता, घरात चोरी झाल्याचे लक्षात आले. याप्रकरणी खरात यांनी तात्काळ लोणी काळभोर पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्यानुसार अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांकडून परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले जात आहे. दरम्यान, भरदिवसा घडलेल्या या धाडसी चोरीमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून, वाढत्या घरफोडीच्या घटनांवर आळा घालण्यासाठी पोलिसांनी गस्त वाढवावी, अशी मागणी स्थानिकांकडून होत आहे.

## मुस्लीम समाजाचे ५ टक्के आरक्षण रद्द; फडणवीस सरकारचा निर्णय

**मुंबई, ता. १८ :** मुस्लीम समाजाला देण्यात आलेले पाच टक्के आरक्षण रद्द करण्यात आले आहे. राज्य सरकारने हा मोठा निर्णय घेतला आहे. त्यामुळे आता मुस्लिम समाजासाठी राबवण्यात येणाऱ्या जात प्रमाणपत्र प्रक्रियेला ब्रेक लावण्यात आला आहे.

या निर्णयाचा सुधारित शासन निर्णय राज्य सरकारकडून प्रकाशित करण्यात आला आहे. या शासनादेश आणि परिपत्रकरात आरक्षण रद्द करण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे. या निर्णयामुळे मुस्लिम समाजात मोठा रोष निर्माण होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. उच्च न्यायालयाने मुस्लिम आरक्षणाला स्थगिती दिल्यानंतर सरकारने हा निर्णय १२ वर्षांनी घेतला आहे. पाच टक्के आरक्षण २०१४ मध्ये तत्कालीन काँग्रेस-राष्ट्रवादी सरकारने अध्यादेशाद्वारे दिले होते. यात शिक्षण आणि सरकारी नोकऱ्यांमध्ये सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास मुस्लिम गटांना विशेष मागास प्रवर्ग-अ अंतर्गत ५ टक्के आरक्षण मिळाले होते.

मात्र, मुंबई उच्च न्यायालयाने या आरक्षणाला स्थगिती दिली होती. त्यानंतर अध्यादेश कायद्यात रूपांतरित झाला नाही, म्हणून घेतलेला निर्णय कायदेशीररित्या लागू राहिले नाही. आता फेब्रुवारी २०२६ मध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने सुधारित शासन निर्णय जारी करून ५ टक्के आरक्षण अधिकृतपणे रद्द केले आहे. यासोबतच त्यासंबंधित जुने शासन निर्णय, परिपत्रके, जातीचे दाखले देण्याची प्रक्रिया आणि जात वैधता प्रमाणपत्र प्रक्रियेला ब्रेक लागला आहे.

या प्रकरणात उच्च न्यायालयाने दिलेल्या स्थगितीमुळे कायदेशीर अडचणी निर्माण झाल्या होत्या. तसेच २०१४ चा अध्यादेश कायद्यात रूपांतरित न झाल्याने आणि १२ वर्षांनंतरही अंमलबजावणी न झाल्याने सरकारने हे पूर्णतः रद्द करण्याचा मोठा निर्णय घेतला आहे. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसआघाडी सरकारने दिलेल्या आरक्षणानंतर प्रक्रिया सुरू करण्यात आली होती.

कोणत्याही चर्चेशिवाय प्रस्ताव मंजूर करण्यात आला. सरकारने सरकारी नोकऱ्या आणि शैक्षणिक संस्थांमध्ये मराठ्यांना १६ टक्के आणि मुस्लिमांना ५ टक्के आरक्षण जाहीर केले होते. यामुळे राज्यातील एकूण आरक्षणाची मर्यादा ७३ टक्के झाली होते. राज्याचे अल्पसंख्याक कल्याण मंत्री नसीम खान यांनी मंत्रिमंडळाच्या बैठकीत मुस्लिम समुदायासाठी ५ टक्के आरक्षणाचा प्रस्ताव मांडला होता. हा प्रस्ताव कोणत्याही चर्चेशिवाय एकमताने मंजूर करण्यात आला होता.

## फुरसुंगी पोलिसांनी तडीपार असलेल्या आरोपीला ठोकल्या बेड्या




**फुरसुंगी, ता. १८ :** पुणे शहरात तडीपार आदेशाचा भंग करून फिरणाऱ्या सराईत आरोपीच्या मुसक्या आवळण्यात फुरसुंगी पोलिसांना यश आले आहे. याप्रकरणी पोलिसांनी दत्ता रामभाऊ होळकर (रा. होळकरवाडी, ता. हवेली) यास पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ५ यांनी आदेश क्र. ८०/२०२४, दिनांक १६ नोव्हेंबर २०२४ अन्वये महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ५६ (१) (अ) (ब) प्रमाणे आरोपी दत्ता रामभाऊ होळकर याला पुणे शहर, पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय हद्द व पुणे जिल्हा कार्यक्षेत्रातून दोन वर्षांसाठी तडीपार केले होते. आरोपीविरुद्ध गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असून तो धोकादायक प्रवृत्तीचा असल्याची नोंद आहे.

फुरसुंगी पोलिसांचे तपास पथक मंगळवारी (ता. १७) परिसरात गस्त घालीत असताना पोलीस अंमलदार अभिजित टिळेकर यांना गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, तडीपार आरोपी दत्ता होळकर हा महादेव मंदिरासमोर, होळकरवाडी येथे आला आहे. सदरची माहिती वरिष्ठांना कळवून त्यांनी दिलेल्या सूचनेनुसार तात्काळ सापळा रचण्यात आला. पोलिसांची चाहूल लागताच आरोपी पळून जाण्याच्या तयारीत होता; मात्र पथकाने वेळीच धाव घेत त्याला शिताफीने जेरबंद केले.

दरम्यान, चौकशीत आरोपीकडे संबंधित क्षेत्रात येण्याबाबत कोणतीही वैध परवानगी नसल्याचे स्पष्ट झाले. तडीपार आदेशाचा भंग केल्याप्रकरणी त्याच्याविरुद्ध फुरसुंगी पोलीस स्टेशन येथे महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १४२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तडीपार आरोपींवर लक्ष ठेवून कठोर कारवाई करण्याचे आदेश वरिष्ठांकडून देण्यात आले असून, गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी अशा कारवाया सुरूच राहणार असल्याचा इशारा पोलिसांनी दिला आहे.

सदरची कामगिरी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली फुरसुंगी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अमोल मोरे, यांचे सुचनेप्रमाणे तपास पथकातील पोलीस हवालदार नितीन गायकवाड, सागर वणवे, हरिदास कदम, श्रीनाथ जाधव, पोलीस अंमलदार हेमंत कामथे, अभिजित टिळेकर यांनी केली आहे.

पुणे प्राईम न्यूज



# लोणावळा परिसरात फिरण्यासाठी आलेल्या २१ वर्षीय युवकाचा पाण्यात बुडून दुर्दैवी अंत



**पुणे, ता. १८ :** पुणे जिल्ह्यातील मुळशी तालुक्यातील एकोले गावाजवळ असलेल्या लोटस पॉईंट परिसरात एक दुर्दैवी घटना घडली असून, पाण्यात बुडून एका तरुणाचा मृत्यू झाला आहे. पर्यटनासाठी प्रसिद्ध असलेल्या या ठिकाणी घडलेल्या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. निसर्गाचा आनंद घेण्यासाठी आलेल्या तरुणाचा असा अचानक मृत्यू झाल्याने सर्वांनाच धक्का बसला आहे. समोर आलेल्या माहितीनुसार, मृत तरुणाचे नाव आयुष हरिणखेडे असून त्याचे वय २१ वर्षे होते. तो मूळचा गोंदिया जिल्ह्यातील रहिवासी असून सध्या पुण्यातील कात्रज भागात वास्तव्यास होता. आयुष आपल्या ५ मित्रांसोबत फिरण्यासाठी मुळशी तालुक्यातील या परिसरात आला होता. फिरताना सर्वजण लोटस पॉईंटजवळ पोहोचले. पाण्याची खोली आणि प्रवाहाचा अंदाज न आल्याने आयुष पाण्यात उतरला. त्याला पोहता येत नसल्याने काही क्षणातच तो खोल पाण्यात गेला आणि बुडाला.

मित्रांनी आरडाओरड करत मदतीसाठी हाक मारली. घटनेची माहिती मिळताच पौड पोलिसांनी तातडीने हालचाली करत बचाव पथकांना पाचारण केले. लोणावळ्यातील शिवदुर्ग रेस्क्यू टीम, वन्यजीव रक्षक मावळ आणि मुळशी आपत्ती व्यवस्थापन पथक घटनास्थळी दाखल झाले. दुपारी १२:३० च्या सुमारास शोधकार्य सुरू करण्यात आले.

सुमारे दीड तासांच्या प्रयत्नांनंतर सायंकाळी साडेपाच वाजता आयुषचा मृतदेह पाण्यातून बाहेर काढण्यात आला. मात्र मृतदेह सुरक्षितपणे रस्त्यापर्यंत आणणे मोठे आव्हान होते. परिसरातील रस्ता नागमोडी, अरुंद आणि घसरडा असल्याने बचाव पथकाला मोठी कसरत करावी लागली. अखेर रात्री नऊ वाजता मृतदेह पौड पोलिसांच्या ताब्यात देण्यात आला. या घटनेनंतर कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

# थेऊरमध्ये विवाहितेचा चार वर्षांपासून अमानुष छळ; पतीसह सासरच्या ५ जणांवर गुन्हा दाखल

**लोणी काळभोर, ता. १८ :** विवाहानंतर अवघ्या काही महिन्यांतच चारित्र्यावर संशय घेणे, सतत टोमणे, शिवीगाळ, मारहाण आणि रात्री-अपरात्री दोन चिमुकल्या मुलांसह घराबाहेर हकलून देणे असा विवाहितेचा क्रूर छळ केल्याची धक्कादायक घटना थेऊर (ता. हवेली) परिसरात घडली आहे. याप्रकरणी पतीसह ५ जणांवर लोणी काळभोर पोलीस ठाण्यात विविध गंभीर कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पती भाऊ युवराज राखपसरे, दादा भीमा लोंढे, सीमा दादा लोंढे, लक्ष्मण भीमा लोंढे, कविता सुनील लोंढे (सर्व रा. थेऊर, ता. हवेली) असे गुन्हा दाखल झालेल्या आरोपींची नावे आहेत. याप्रकरणी एका २३ वर्षीय विवाहितेने लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित महिलेचा विवाह २४ मे २०२० रोजी थेऊर येथे भाऊ राखपसरे याच्यासोबत झाला होता. सुरुवातीला संसार सुरळीत होता; परंतु, पिडीतेला दिवस गेल्यानंतर सासरच्या मंडळींकडून संशयाची सुरुवात झाली. पिडीता यांना मुलगी झाल्यानंतर सासरच्या मंडळींनी शारीरिक व मानसिक त्रास देण्यास सुरवात केली.

पिडीतेला पती भाऊ राखपसरे याच्या मोबाईलमध्ये आयटी कंपनीतील महिलांसोबतचे प्रेम संबंधाचे चॅट, व्हॉइस रेकॉर्डिंग व फोटो आढळले. याबाबत जाब विचारल्यावर भाऊ राखपसरे यांनी उडवाउडवीची उत्तरे देत पीडितांना मारहाण केली. पिडीतांनी नातेवाईकांकडे तक्रार केल्यावर तो पुरुष आहे, त्याला जे वाटेल ते करेल असे सांगत उलट पीडितेलाच शिवीगाळ करण्यात आली. पुढील काळात मारहाण, अपमान, घरकामावरून भांडणे आणि घराबाहेर काढणे हे प्रकार नियमित झाले.

दरम्यान, फेब्रुवारी २०२५ मध्ये जत्रेत भाऊ राखपसरे हा दुसऱ्या तरुणीसोबत जवळीक साधताना दिसल्यानंतर पिडीता यांनी जाब विचारला. तेव्हा त्यांना पुन्हा मारहाण व घराबाहेर काढण्याची धमकी देण्यात आली. १२ डिसेंबर २०२५ रोजी घरातील देवकार्यावेळी नातेवाईकांनी खोटी माहिती दिली म्हणून भाऊ राखपसरे यांनी पिडीता यांना बेदम मारहाण केली.

पिडीता यांनी मदतीसाठी आजी-आजोबांना बोलावल्यावर त्यांनाही शिवीगाळ केली. तसेच सर्वांनी मिळून पीडितेला दोन मुलांसह घराबाहेर हाकलून दिले. अशी तक्रार पिडीता यांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात दिली आहे. त्यानुसार पतीसह त्याचे मामा व मावश्या यांच्याविरोधात भारतीय न्याय संहिता कलम ११५ (२), ३ (५), ३५२, ८५ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक दिगंबर सोनटक्के करत आहेत.

# भरधाव ट्रॅव्हल्सची बसला धडक; थोडक्यात बचावले प्रवासी, वाहनांचे मोठे नुकसान

**गडचिरोली, ता. १८ :** गडचिरोली जिल्ह्यातील सिरोंचा तालुक्यात एका बसचा मोठा अपघात टळल्याची घटना समोर आली आहे. सुमारे ३० प्रवाशांना घेऊन जाणारी बस मोठ्या नाल्याच्या वळणावर उलटून अर्ध्यावरच लटकली. सुदैवाने बस थेट ६ फुट खोल पाण्यात कोसळली नाही. अन्यथा मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता होती. या घटनेमुळे प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून सर्वत्र चिंता व्यक्त केली जात आहे.

सिरोंचावरून रेगुंटाकडे जाणारी एसटी बस रात्रीच्या सुमारास कंबालपेटा नाला ते टेकडा परिसरात आली होती. या ठिकाणी पुलाचे काम सुरू असल्यामुळे वाहतुकीसाठी तात्पुरता कच्चा वळण मार्ग तयार करण्यात आला आहे. रात्री अंधारात या

## आरमोरी मार्गावरील चुरमुरा ते किटाळी गावादरम्यान अपघात



वळणावरून जात असताना चालकाचा बसवरील ताबा सुटला आणि बस थेट नाल्याच्या कडेला जाऊन एका बाजूला झुकली. बस नाल्यात पडणार अशी परिस्थिती निर्माण झाल्याने प्रवाशांमध्ये एकच गोंधळ उडाला.

बस एका बाजूला लटकलेली असताना प्रवाशांनी प्रसंगावधान राखत खिडक्यांमधून आणि दरवाज्यातून बाहेर पडण्यास सुरुवात केली. काही प्रवाशांनी एकमेकांना मदत करत सुरक्षितपणे बाहेर काढले. नाल्यात सुमारे ६ फुट पाणी असल्याने बस पूर्णपणे उलटली असती तर मोठी जीवितहानी झाली असती, असे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले.

धक्कादायक बाब म्हणजे अपघातानंतर चालकाने प्रवाशांना मदत न करता स्वतः बसमधून उडी मारून घटनास्थळावरून पळ काढला. त्यामुळे प्रवाशांमध्ये संतापाची भावना आहे. रात्रीच्या वेळी परिसर निर्जन असल्याने मदत मिळण्यास उशीर झाला. स्थानिक नागरिकांनी पुलाचे काम संथ गतीने सुरू असल्याचा आणि कच्चा रस्ता धोकादायक असल्याचा आरोप केला आहे. प्रवाशांच्या सुरक्षेकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधितांवर तसेच चालकावर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात येत आहे.

# अल्पवयीन मुलीवरील अत्याचार प्रकरणी आरोपी जेरबंद; फुरसुंगी पोलिसांची कामगिरी

**फुरसुंगी, ता. १७ :** अल्पवयीन मुलीस फुस लावून तिच्यावर जबरदस्तीने शारीरिक संबंध प्रस्थापित करणाऱ्या आरोपीला फुरसुंगी पोलिसांनी अटक केली आहे. ७ जानेवारी २०२६ ला हि घटना घडली होती. याप्रकरणी पीडितेने ८ जानेवारी २०२६ रोजी फुरसुंगी पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ७ जानेवारी २०२६ रोजी दुपारच्या सुमारास फिर्यादी अल्पवयीन असल्याची माहिती असतानाही आरोपीने तिच्याशी जवळीक साधून तिच्या इच्छेविरुद्ध जबरदस्तीने शारीरिक संबंध प्रस्थापित केले. तसेच तिचे फोटो व्हायरल करण्याची धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद आहे.




वरिष्ठांच्या आदेशानुसार विशेष पोलीस पथक स्थापन करून आरोपीचा शोध सुरू करण्यात आला. तांत्रिक विश्लेषण व गोपनीय माहितीच्या आधारे आरोपी आपले वास्तव्य सतत बदलत असल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे आरोपीचा शोध घेवून गुन्हयात अटक करणे पोलीसांपुढे आव्हान निर्माण झाले होते. आरोपीचा शोध घेत असाताना गोपनिय माहीती मिळाली की, तो धोम, ता. वाई, जि. सातारा येथे येणार असल्याची माहिती मिळाली.

पोलीस पथकाने आरोपीधा माग काढून सापळा रचला व आरोपीस शिताफीने ताब्यात घेतले. त्याचेकडे गुन्हयाचे अनुषंगाने तपास केला असता त्याने गुन्हा केला असल्याचे निष्पन्न झाले आहे. सदर गुन्हा दाखल होताच तात्काळ गुन्हयाची उकल करण्यात फुरसुंगी पोलीसांना यश आले. त्यावरुन फुरसुंगी पोलीस स्टेशन गु.रजि.नं. १३ /२०२६ भारतीय न्याय संहिता कलम ६४ (१), बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण अधिनियम कलम ४. ८. १२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली फुरसुंगी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक अमोल मोरे, यांच्या सूचनेनुसार पोलीस उपनिरीक्षक विनोद पवार, पोलीस हवालदार सागर वणवे, पोलीस अमलदार हेमंत कामथे यांनी केली आहे. पोलीस उप-निरीक्षक, रविंद्र डावरे हे करत आहेत.




Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

पुणे प्राईम न्यूज
http://www.puneprimenews.com

प्राईम लाईफ

## आहारामध्ये उन्हाळ्यात करा रसदार फळांचा समावेश

**पुणे, ता. १८ :** उन्हाळा सुरु झाल्यावर आपल्या शरीरातील पाण्याचे प्रमाण खूप कमी होते. अशा वातावरणात आपल्या आहारामध्ये रसदार फळांचा समावेश करणे खूप गरजेचे असते. रसदार फळांमध्ये कलिंगड देखील आहे. उन्हाळ्यामध्ये कलिंगड खाणे आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर ठरते. कलिंगडामध्ये सुमारे ९०-९२ टक्के पाणी असते, त्यामुळे शरीरातील पाण्याची कमतरता भरून निघते आणि डिहायड्रेशन टाळण्यास मदत होते. उष्ण हवामानामुळे होणारा थकवा, चक्कर येणे किंवा अशक्तपणा कमी करण्यासाठी कलिंगड उपयुक्त आहे.

कलिंगडामध्ये जीवनसत्त्व अ आणि क भरपूर प्रमाणात असतात. जीवनसत्त्व क रोगप्रतिकारशक्ती वाढवते, तर जीवनसत्त्व अ डोळ्यांच्या आरोग्यासाठी आणि त्वचेच्या तजेल्यासाठी उपयुक्त आहे. त्यात लाइकोपीन नावाचे अँटीऑक्सिडंट असते, जे हृदयाचे आरोग्य सुधारण्यास आणि शरीरातील हानिकारक घटकांपासून संरक्षण करण्यास मदत करते.

उन्हाळ्यात पचनक्रिया बिघडण्याची शक्यता असते. कलिंगडातील फायबर पचन सुधारते आणि बद्धकोष्ठता कमी करते. तसेच ते कमी कॅलरीयुक्त असल्यामुळे वजन नियंत्रणासाठीही चांगले आहे. कलिंगड शरीराला नैसर्गिक थंडावा देते आणि ताजेतवाने ठेवते. त्यामुळे उन्हाळ्यात दररोज योग्य प्रमाणात कलिंगड खाल्ल्यास शरीर निरोगी आणि ऊर्जावान राहण्यास मदत होते.

वजन कमी करू इच्छिणाऱ्या लोकांसाठीही कलिंगड चांगले आहे, कारण त्यात कॅलरीज कमी आणि पाणी जास्त असते. पचनक्रिया सुधारण्यासाठीही ते उपयुक्त ठरते. नियमित प्रमाणात कलिंगड खाल्ल्यास शरीर ताजेतवाने राहते आणि उष्णतेपासून संरक्षण मिळते. त्यामुळे उन्हाळ्यात कलिंगडाचा आहारात समावेश करणे आरोग्यासाठी अत्यंत लाभदायक आहे.

# माझ्या नादाला लागू नका मनोज जरांगे-पाटलांचा धनंजय मुंडेंवर हल्लाबोल

**छत्रपती संभाजीनगर, ता. १८ :** मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून राज्यात पुन्हा एकदा राजकीय वातावरण तापले आहे. मराठा आरक्षणासाठी आंदोलन करणारे मनोज जरांगे पाटील आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तथा माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्यातील वाद आता नव्या टप्प्यावर पोहोचला आहे. छत्रपती संभाजीनगर दौऱ्यावर असताना जरांगे पाटील यांनी धनंजय मुंडे यांच्यावर गंभीर आरोप करत थेट इशाराच दिला.

प्रसारमाध्यमांशी बोलताना जरांगे म्हणाले, धनंजय मुंडे यांच्या माझ्याकडे २२ पेक्षा जास्त प्रकरणांची माहिती आली आहे. त्यामुळे इथून पुढे माझ्या नादाला लागू नका. मी अजून त्या प्रकरणांत हात घातलेला नाही, पण गरज पडली तर सर्व उघड करेन. त्यांच्या या वक्तव्यामुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

जरांगे यांनी पुढे आरोप करत म्हटले की, घातपाताच्या सुपाऱ्या देऊन आमचेच लोक उचकवले जात आहेत. आम्ही संपूर्ण माहिती घेत आहोत. तुमची लाभार्थी टोळी माझ्याविरोधात कशी लावली गेली, हे मला ठाऊक आहे. अजूनही वेळ आहे, सावध व्हा. त्यांनी नागपूरमधील एका महिलेचा उल्लेख करत, तिच्याकडून गंभीर माहिती मिळाल्याचा दावा केला.

माझ्यावर जे आरोप केले जात आहेत, त्यावर मी फौजदारी गुन्हे दाखल केले तर आरोप करणाऱ्यांना जेलची हवा खावी लागेल, असा इशाराही त्यांनी दिला. मी मागे




लागलो तर तुमची अनेक प्रकरणं बाहेर येतील, असेही जरांगे यांनी स्पष्ट केले.

धनंजय मुंडे यांना उद्देशून बोलताना जरांगे म्हणाले, रक्ताने हात भरलेल्या लोकांना सरकार का सांभाळेल? संतोष भैया देशमुख यांना अजून न्याय मिळालेला नाही. अशा लोकांना मंत्रिपद देण्याचा प्रश्नच नाही. या वक्तव्यामुळे वाद अधिक चिघळण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

दरम्यान, मराठा आरक्षणासंदर्भात त्यांनी सरकारलाही इशारा दिला. फडणवीस, शिंदे आणि विखे पाटील यांनी मराठ्यांना आरक्षण दिले आहे. मात्र अधिकाऱ्यांकडून जीआरची अंमलबजावणी होत नाही. सरकार मोठं की अधिकारी? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. शिंदे समितीला मुदतवाढ दिल्यानंतरही नोंदी शोधण्याचे काम का होत नाही, याचे उत्तर सरकारने द्यावे, अशी मागणी त्यांनी केली.

व्हॅलिडिटी प्रमाणपत्रे जाणूनबुजून रोखली जात आहेत. सारथी आणि अण्णासाहेब विकास महामंडळासंदर्भातील मुद्देही आम्ही मांडले आहेत. या अधिवेशनानंतर आम्ही ऐकणार नाही. पुन्हा आंदोलनाची भूमिका घ्यावी लागली, तर सरकार अडचणीत येईल, असा इशाराही जरांगे यांनी दिला.

एकूणच, मनोज जरांगे पाटील यांच्या आक्रमक भूमिकेमुळे मराठा आरक्षणाचा प्रश्न आणि त्यासोबतचे राजकीय आरोप-प्रत्यारोप पुन्हा एकदा केंद्रस्थानी आले आहेत. धनंजय मुंडे यांच्याकडून यावर काय प्रतिक्रिया येते, याकडे आता राज्याचे लक्ष लागले आहे.



## राजपाल यादवला अंतरिम जामीन मंजूर

**मुंबई, ता. १८ :** अभिनेता राजपाल यादव याला दिल्ली उच्च न्यायालयाने अंतरिम जामीन मंजूर केला. न्यायालयाने त्याला आज दुपारी ३ वाजेपर्यंत डिमांड ड्राफ्टच्या स्वरुपात १.५ कोटी रुपये जमा करण्याचे निर्देश दिले होते. ते जमा केल्यानंतरच जामीन मंजूर केला तसेच त्याच्या शिक्षेला १८ मार्चपर्यंत स्थगिती दिली. राजपाल यादव याला चेक बाउंस प्रकरणी तुरुंगवासाची शिक्षा ठोठावण्यात आली होती. त्याला तिहार तुरुंगात आत्मसमर्पण करण्याचे आदेश उच्च न्यायालयाने दिले होते. त्यानंतर त्याने हायकोर्टात धाव घेतली होती.

## वाघोलीत भांड्याचा वाद जिवावर बेतला; बेदम मारहाणीत एकाचा मृत्यू

**पुणे, ता. १८ :** नातेवाईकांकडे ठेवलेल्या गृहोपयोगी वस्तू, तसेच भांड्याच्या वादातून एकाला बेदम मारहाण करण्यत आला. मारहाणीत जखमी झालेल्या एकाचा मृत्यू झाला. खून प्रकरणात एका दाम्पत्याला अटक करण्यात आली आहे. नगर रस्त्यावरील वाघोली परिसरात ही घटना घडली. भास्कर मोहन राठोड (वय-५८, रा. कोलदंडी, जिंतूर, परभणी) असे खून झालेल्याचे नाव आहे. या प्रकरणी आनंद रवींद्र वर्मा (वय-२६), शीला आनंद वर्मा (वय -२४, दोघे रा. आव्हाळवाडी, वाघोली, नगर रस्ता) यांना अटक करण्यात आली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, राठोड हे मूळचे परभणीतील जिंतूरचे रहिवासी आहेत. ते कामानिमित्त पुण्यात आले होते. वाघोलीतील आव्हाळवाडी भागात त्यांनी भाडेतत्त्वावर खोली घेतली होती. राठोड यांच्या शेजारी आरोपी वर्मा दाम्पत्य राहायला आहे. काही दिवसांपूर्वी त्यांनी गृहोपयोगी साहित्य आणि भांडी वर्मा दाम्पत्याकडे दिली होती. १६ फेब्रुवारीला राठोड यांनी वर्मा दाम्पत्याकडे भांडी मागितली. भांडी परत मागितल्यानंतर वादा झाला. वादातून वर्मा दाम्पत्याने राठोड यांना बेदम मारहाण केली. मारहाणीत राठोड हे गंभीर जखमी झाले. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. पोलीस उपरीक्षक शहादेव शहाळे तपास करत आहेत.

# ग्रामपंचायत निवडणुकांसाठी प्रभाग रचनेचे वेळापत्रक जाहीर

### ७ एप्रिलला प्रसिध्द होणार प्रारुप प्रभाग

**पुणे, ता. १८ :** राज्यातील ज्या ग्रामपंचायतींची मुदत जानेवारी २०२६ ते डिसेंबर २०२६ दरम्यान संपत आहे, तसेच नव्याने स्थापन झालेल्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रभाग रचनेचा अधिकृत कार्यक्रम जाहीर झाला आहे. या निर्णयामुळे ग्रामीण भागातील राजकीय हालचालींना वेग आला असून पूर्व हवेलीतील सर्वात मोठ्या लोणी काळभोर, उरुळी कांचन, कुंजीरवाडी व थेऊर या वेगाने वाढणाऱ्या गावांमध्ये विशेष उत्सुकता निर्माण झाली आहे.

ग्रामविकास विभागाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार २० फेब्रुवारी २०२६ पासून प्रभाग रचनेची प्रक्रिया सुरू होणार आहे. ७ एप्रिल २०२६ रोजी प्रारूप प्रभाग रचना प्रसिद्ध केली




जाईल. त्यानंतर नागरिकांना हरकती नोंदवण्याची संधी मिळणार आहे. अंतिम प्रभाग रचना ४ मे २०२६ रोजी जाहीर होईल.

लोणी काळभोर, उरुळी कांचन आणि थेऊर या तिन्ही गावांचा गेल्या काही वर्षांत झपाट्याने विकास झाला आहे. औद्योगिक वाढ, वाढती लोकसंख्या, नवीन गृहनिर्माण प्रकल्प आणि पायाभूत सुविधा यामुळे मतदारसंख्येत लक्षणीय वाढ झाली आहे. त्यामुळे या गावांमध्ये प्रभागांची फेररचना महत्त्वाची ठरणार आहे. स्थानिक पातळीवर कोणत्या वस्तीचा कोणत्या प्रभागात समावेश होणार, आरक्षणाची मांडणी कशी होणार आणि कोणत्या भागात नवीन राजकीय समीकरणे तयार होणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

प्रभाग रचना तीन टप्प्यांत पार पडणार आहे. तहसीलदार २० फेब्रुवारीपर्यंत नकाशे अंतिम करतील. त्यानंतर तलाठी आणि ग्रामसेवक २७ फेब्रुवारीपर्यंत प्रत्यक्ष पाहणी करून प्रभाग निश्चित करतील. जिल्हाधिकारी स्तरावर पडताळणी होऊन प्रस्ताव राज्य निवडणूक आयोगाकडे पाठवला जाईल.

दरम्यान, लोणी काळभोर, उरुळी कांचन आणि थेऊरमध्ये आगामी निवडणुकीपूर्वीच राजकीय रणनीती आखण्यास सुरुवात झाली असून प्रभाग रचना हा पुढील राजकीय लढतीचा पाया ठरणार आहे. ७ एप्रिलला प्रारूप रचना जाहीर झाल्यानंतर १३ एप्रिलपर्यंत हरकती दाखल करता येतील. २१ एप्रिलपर्यंत सुनावण्या होऊन २८ एप्रिलपर्यंत अंतिम प्रस्ताव तयार केला जाईल.

## देवाच्या दर्शनासाठी घराबाहेर पडलेल्या अल्पवयीन मुलीचे अपहरण

**लोणी काळभोर, ता. १७ :** महाशिवरात्रीनिमित्त महादेवाच्या दर्शनासाठी गेलेल्या एका १६ वर्षाच्या अल्पवयीन मुलीला कोणीतरी अज्ञात इसमाने फुस लावून नेल्याची घटना घडली आहे. ही घटना लोणी काळभोर (ता. हवेली) परिसरात घडली असून रविवारी (ता.१५) संध्याकाळी उघडकीस आली आहे. याप्रकरणी अल्पवयीन मुलीच्या वडिलांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, अज्ञात इसमाविरोधात अपहरणाचा गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, संबंधित कुटुंब लोणी काळभोर परिसरात वास्तव्यास आहे. पीडित मुलीने सातवीतूनच शिक्षण सोडले होते. रविवारी महाशिवरात्रीच्या निमित्ताने मंदिरात जाऊन येते असे सांगून ती घरातून बाहेर पडली. मात्र संध्याकाळ झाली तरी ती घरी परतली नाही.

अल्पवयीन मुलीच्या आई-वडिलांनी परिसरात शोध घेतला, मित्र-मैत्रिणी व नातेवाईकांकडे चौकशी केली; मात्र कुठेही तिचा ठावठिकाणा लागला नाही. अखेर कोणीतरी अज्ञात इसमाने कशाचंतरी आमिष दाखवून मुलीला पळवून नेल्याचा संशय व्यक्त करत वडिलांनी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार अज्ञात इसमाच्या विरोधात भारतीय न्याय संहिता कलम १३७ (२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास लोणी काळभोर पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षक (गुन्हे) स्मिता पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक सोमनाथ नाळे करत आहेत.

# विमान आदळून भीषण स्फोट व्हावा म्हणून अतिरिक्त इंधन साठा; रोहित पवारांचा खळबळजनक दावा

**पुणे, ता. १८ :** अजित पवार यांच्या विमान अपघाताबाबत अनेक शंका उपस्थित केल्या जात आहेत. हा अपघात नसून घातपात आहे, असा दावा त्यांचे पुतणे रोहित पवार यांनी केला आहे. काही दिवसांपूर्वी त्यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी अनेक प्रश्न मांडले होते. तर आजच्या पत्रकार परिषदेत त्यांनी पुरावेच सादर केले आहेत. यातून त्यांनी अनेक शंकाही निर्माण केल्या आहेत. तसंच, विमानात इंधनाचा अतिरिक्त साठाच होता, त्यामुळे विमानाचा भीषण स्फोट झाला, असाही दावा त्यांनी केलाय.



विमानाचा एकच नाही तर, विमानाचे बरेच स्फोट झाले होते. २०२३ मध्ये जो विमान अपघात झाला, त्याचं विमान मोठं होतं. हे विमान रनवेवर पडलं होतं. रनवे डांबरी होता. पण दादांचं विमान साईडला पडलं. जर बॉल फरशीवर टाकला तर बाऊन्स जास्त होतो, पण मातीत टाकला तर कमी बाऊन्स होतो. तसंच, दादांचं विमान रनवेवर पडलं नाही, त्यामुळे त्याची वेलोसिटी कमी होती. मग स्फोट का झाला? त्यामुळे त्यात अधिकचे फ्युएल टँक होते, म्हणून स्फोट झाला ही आमची शंका खरी होत आहे. हे फ्युएल टँक टॉयलेटच्या बाजूला असतात. त्याच्याच मागच्या बाजूला (पंखांच्या इथे) ब्लॅक बॉक्स असतो, असं रोहित पवार म्हणाले.

या पंखांत टँक फुल भरला होता. हे विमान सुरतहून मुंबईमार्गे बारामतीला आलं होतं. बारामतीहून पुन्हा हैदराबादला जाणार होतं. त्यामुळे हैदराबादला जाऊनही इंधन भरता आलं असतं. पण टँक पूर्णपणे भरून म्हणजेच तीन हजार लीटर इंधन भरून विमान बारामतील नेण्यात आलं. याचं कारण काय? पायलटचा वापर करून घातपात झाला असावा, त्यात फ्युएल जास्त असल्याने मोठा स्फोट होईल अशी शंका खरी होताना दिसते आहे. हा फ्लाइट प्लान आहे. पण डीजीसीएला ते फ्लाईन प्लान कळवला नव्हता, असं रोहित पवार म्हणाले.

**विमान जाणीवपूर्वक आदळलं**

विमान लँड होत असताना तीन हजार किमी दृष्यमानता होती. नियमानुसार, ५ हजार किमी दृष्यमानता असेल तरच लँडिंग करता येतं. त्यामुळे हे विमान तिथल्या तिथे घिरट्या मारत बसलं. हे विमान पुणे, चिपी विमानतळावर ते उतरू शकत नव्हतं. त्यामुळे त्यांनी पुन्हा मुंबईत यायला हवं होतं. पण त्यांनी तसं न करता बारामतीतच लँड करण्याचा प्रयत्न केला. त्या विमानात आधीच पुरेसा इंधन साठा होता, शिवाय अतिरिक्त इंधन टँकही होते. त्यामुळे हे विमान जाणीवपूर्वकआदळण्यात आलं, असा आरोपही रोहित पवारांनी केला.

## बारामतीत प्रेयसीच्या त्रासाला कंटाळून तरुणाची आत्महत्या; तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

**बारामती, ता. १८ :** येथील एका २३ वर्षीय तरुणाने मानसिक त्रासाला कंटाळून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. मृत तरुणाचे नाव विक्रम उर्फ बबलू कोळपे असून तो रुई बयाजीनगर भागातील रहिवासी होता. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून प्रेमसंबंधातून निर्माण होणाऱ्या तणावाचे गंभीर चित्र समोर आले आहे.

विक्रम आणि पुणे येथील खडकवासला भागात राहणारी सृष्टी मते यांचे गेल्या ५ वर्षांपासून प्रेमसंबंध होते. विक्रमचा लग्नाचा विचार होता आणि त्यासाठी त्याने सृष्टीच्या कुटुंबाकडे काही दागिनेही दिल्याचे कुटुंबीय सांगत आहेत. मात्र काही काळानंतर घरच्यांचा विरोध असल्याचे कारण देत सृष्टीने लग्नास नकार दिला. यानंतर



विक्रमला वारंवार फोन करून मानसिक त्रास दिला जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

कुटुंबीयांच्या माहितीनुसार २७ डिसेंबर २०२५ पासून विक्रमला ब्लॅकमेल केले जात होते. ५ जानेवारी रोजी त्याला पुण्यात बोलावून मोबाईलमधील खाजगी माहिती जबरदस्तीने डिलीट करण्यात आली. तसेच जीवे मारण्याच्या धमक्याही दिल्या गेल्याचे सांगण्यात येत आहे. या सर्व प्रकारामुळे विक्रम प्रचंड मानसिक दबावाखाली होता.

१५ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ७:०० वाजता विक्रमने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. आत्महत्येपूर्वी त्याने एक चिठ्ठी लिहून ठेवली होती. त्या चिठ्ठीत आईची माफी मागत आपल्याला ब्लॅकमेल केले जात असून मानसिक त्रास दिला जात असल्याचा उल्लेख केला आहे. पोलिसांनी ही चिठ्ठी जप्त केली असून मोबाईल कॉल रेकॉर्ड आणि इतर पुराव्यांची तपासणी सुरू केली आहे.

या प्रकरणी बारामती पोलिसांनी सृष्टी मते, तिची बहीण आणि वडील विकास मते यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. तिन्ही आरोपी फरार असून त्यांचा शोध सुरू आहे. या घटनेने कोळपे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून बारामती शहरात या प्रकरणाची मोठी चर्चा सुरू आहे.

## कात्रज भागातील महिलेचा खून प्रकरणाचा उलगडा; सहा जण अटकेत

पुणे, ता. १८ : कात्रज भागातील मांगडेवाडी परिसरात मृतावस्थेत सापडलेल्या महिलेच्या खुनाचा उलगडा गुन्हे शाखेने केला. या प्रकरणात रिक्षाचालकासह सहा जणांना अटक करण्यात आली. खून केल्यानंतर पकडले जाण्याची भीती असल्याने रिक्षा चालकाने रिक्षाच्या छतावरील कापड (हूड) बदलल्याचे तपासात उघडकीस आले.

या प्रकरणी रिक्षाचालक केशव कमलेश चौधरी (वय-२०, रा. भारतनगर, कात्रज), सोनू लक्ष्मण पवार (वय -१८), अब्दुल मोहंमद शेख (वय-२३), महादेव अर्जुन व्होरडे (वय-४०), साई अमित पुजारी (वय-१९), सोहेल हनिफ खान (वय-२१) यांना अटक करण्यात आली. आरोपी साई पुजारी, सोनू पवार हे सराइत आहेत. कात्रजमधील मांगडेवाडीत असलेल्या खाणीत एका ४० वर्षीय महिलेचा मृतदेह पोलिसांना १० फेब्रुवारी रोजी सापडला होता. या प्रकरणी सुरुवातीला भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू अशी नोंद करण्यात आली होती.गुन्हे शाखेकडून या प्रकरणाचा समांतर तपास करण्यात येत होता.

पोलिसांना धागेदोरे सापडले नव्हते. कात्रज घाटासह परिसरातील ९७ ठिकाणच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांनी केलेले चित्रीकरण पोलिसांनी तपासले होते. चित्रीकरणात रिक्षा आढळून आली होती. या रिक्षाचा क्रमांकावरुन तपास करण्यात आला. रिक्षा चालक चौधरीला ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्याने साथीदारांच्या मदतीने महिलेला खाणीत ढकलून दिल्याची कबुली दिली. पकडले जाण्याची भीती वाटल्याने त्याने गुन्हा केल्यानंतर रिक्षाचे हुड बदलल्याचे उघडकीस आले.

गुन्हे शाखेचे अतिरिक्त आयुक्त पंकज देशमुख, उपायुक्त निखील पिंगळे, सहायक आयुक्त शैलेश संखे यांच्य मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अश्विनी जगताप, सहायक निरीक्षक अमोल रसाळ, उपनिरीक्षक संजय जाधव, विजय पवार, विशाल दळवी, प्रवीण उत्तेकर, साधना ताम्हाणे, शंकर कुंभार, विनोद चव्हाण, योगेश मांढरे, संदीप शिर्के यांनी ही कामगिरी केली.

कात्रज परिसरात १० फेब्रुवारी रोजी महिलेने रिक्षा थांबविली. महिलेने आरोपींना कात्रज परिसरातील एका हॉटेलजवळ सोडण्यास सांगितले. रिक्षाचालक आरोपी चौधरीचे साथीदार अब्दुल शेख, सोनू पवार हे रिक्षात होते. शेख आणि पवार यांनी मद्यप्राशन केले होते. महिलेला सोडण्याचा बहाणा करुन आरोपींनी तिला मांगडेवाडी परिसरात नेले. आरोपींनी महिलेवर अतिप्रसंग केल्याची शक्यता आहे. महिलेने विरोध केल्यानंतर तिला खाणीत ढकलून दिल्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली.

# बनावट कागदपत्रांच्या आधारे पिस्टल मिळवणाऱ्या गुन्हेगारावर गुन्हा दाखल

**लोणी काळभोर, ता. १८ :** बनावट आधारकार्ड, खोटे हमीपत्र आणि गुन्हे लपवून एका गुन्हेगाराने थेट पिस्टलचा परवाना मिळवल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. हा प्रकार लोणी काळभोर पोलिसांनी परवान्यासाठी दिलेल्या पत्त्यावर जाऊन चौकशी केल्यानंतर समोर आला आहे. या प्रकारामुळे गुन्हेगाराने पोलीस यंत्रणेलाही हादरवून सोडले आहे.

लोणी काळभोर पोलीस ठाण्यात रोहित ऊर्फ बाळा किसन भामे (वय-२२, डोणजे, ता. हवेली) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी पोलीस हवालदार तेज भोसले यांनी सरकारच्या वतीने




पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रोहित ऊर्फ बाळा भामे याने आपण लोणी काळभोर येथील तरवडी रानमळा परिसरात वास्तव्यास असल्याचे खोटे कागदपत्र तयार केले होते. आणि या कागदपत्रांच्या सहाय्याने पुणे पोलीस आयुक्तालय येथे नवीन शस्त्र परवान्यासाठी अर्ज दाखल केला होता. आधारकार्ड व हमीपत्राच्याआधारेत्यानेयशस्वीपणे पिस्टल परवाना मिळवला आहे. मात्र नंतर झालेल्या चौकशीत हा सारा प्रकार फसवणुकीचा असल्याचे निष्पन्न झाले. परवान्यासाठी दिलेल्या पत्त्यावर लोणी काळभोर पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षक (गुन्हे) स्मिता पाटील यांनी त्यांच्या सहकाऱ्यांसह जाऊन प्रत्यक्ष चौकशी केली असता, संबंधित इसम त्या ठिकाणी कधीही राहत नसल्याचे स्पष्ट झाले. म्हणजेच जाणीवपूर्वक खोटा पत्ता वापरून पोलिसांची दिशाभूल करण्यात आली होती.

धक्कादायक बाब म्हणजे, रोहित भामे हा आधीपासूनच रेकॉर्डवरील गुन्हेगार असून त्याच्यावर हवेली पोलीस ठाण्यात घरफोडी, नुकसान, अडवणूक आदी स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. एवढेच नव्हे तर सन २०२४ मध्ये त्याच्यावर आर्म ॲक्टअंतर्गतही गंभीर गुन्हा दाखल आहे. तरीसुद्धा आरोपीने माझ्यावर कोणतेही गुन्हे नाहीत असे खोटे हमीपत्र देत शस्त्र परवाना क्रमांक ०३२ व पिस्टल मिळवली.

दरम्यान, आरोपी रोहित भामे याने लोणी काळभोर गावात केदारनाथ ब्रिक्स नावाने व्यवसाय असल्याची खोटी माहिती देण्यात आली होती. एकूणच बनावट कागदपत्रे तयार करून ती खरी असल्याचे भासवत शासनाची फसवणूक करण्यात आली.

अशी फिर्याद पोलीस हवालदार तेज भोसले यांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात दिली आहे. त्यानुसार आरोपी रोहित ऊर्फ बाळा किसन भामे याच्याविरोधात भारतीय दंड संहिता कलम ४२०, ४६५, ४७१, १८१ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.